# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यालय, औरंगाबाद

## कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर (का.)

# नियमित कार्यक्रम अहवाल

## शैक्षणिक वर्षे - २०१६-१७

दि.०१ एप्रिल ते १५ एप्रिल २०१६ या कालावधीत झोपडपट्टी भागामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तेथे संविधान शपथ देण्यात अली व १४ एप्रिल २०१६ रोजी महाविद्यालायत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

दि.१६ ते ३० एप्रिल या कालवधित राष्ट्रीय स्मारक यांची देखभाल करण्यात आली.

केंद्र शासनाच्या पर्यावरण वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या सेबत सलग्नीत अर्धशासकीय उपक्रमांतर्गत महाविद्यालय आणि शाळा यामध्ये इको क्लबची स्थापना करण्यात आली. या क्लबचे अध्यक्ष स्वयंसेवक रामसिंग गडदे यांची निवड करण्यात आली. या क्लबद्वारे रा.से.यो. विभागाने स्वच्छभारत अभियान आणि पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक उपक्रम स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, गांडूळखत निर्मिती कंपोष्टखत निर्मिती इ. उपक्रमाबरोबरच पर्यावरणपुरक उत्सवामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवण्यासाठी प्रोत्साहन दिले.

दि.१४.०६.२०१६ रोजी वयाची १८ वर्षे पुर्ण केलेल्या विद्यार्थी मतदार ओळखपत्र वाटप करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणुन तहसील कार्यालयाचे श्री.आर.यु.बडे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते मतदार ओळखपत्र वाटप कार्यक्रम घेण्यात आला.

दि.२१.०७.२०१६ रोजी राष्ट्रीय सेवा येजना विभागात प्रवेश घेण्यासाठी नोटीस बोर्डावर नोटीस लावण्यात आली व स्वयंसेवकांनी अर्ज करण्यास सुरूवात केली. खुप मोठयाप्रमाणात अर्ज आले. जवळपास २७४ अर्ज दाखल झाले. पैकी २०० अर्ज वैद्य ठरविण्यात आले व त्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांची यादी विद्यापीठात सादर केली.

दि.१ जुलै ते ७ जुलै या कालावधीत वनमहोत्सवा निमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले व प्रत्येक विद्यार्थ्यांकडून आपापल्या गांवात शाळा, दवाखाना, सार्वजनिक ठिकाणे इ. च्या परिसरात वृक्षारोपण करण्याच्या सुचना दिल्या. शिरूर येथील शासकिय नर्सरी मधुन वृक्ष रोपणासाठी कलमांचे वाटप करण्यात अले व महाविद्यालय परिसरात १०० वृक्ष लागवड केली. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने मिळुन ३००+१०० = ४०० वृक्षारोपण रा.से.यो. विभागामार्फत करण्यात आले. ट I I प्रसंगी गावातुन वृक्षदिंडी काढण्यात आली. या प्रसंगी अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने होत्या, उपप्राचार्य डॉ.एस.के. तुपे, रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे, प्रा.उध्दव चौधर यांची प्रमुख उपस्थिती होती.



Scanned by CamScanner

प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने म्हणाल्या की, ''पार्यवरण रक्षणासाठी परिसर स्वच्छतेसाठी वृक्ष लागवड करणे हा शासनाचा स्तुत्य उपक्रम आहे. शासनाच्या प्रत्येक उपक्रमात रा.से.यो. विभाग सहभागी होतो हे प्रगतीचे लक्षण आहे असेही त्या म्हणाल्या.'' या प्रसंगी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

दि.२१ जुन २०१६ आंतरराष्ट्रीय योगादिन महाविद्यालयात साजरा करण्यांत आला योगशिक्षक दिलीप जायभाये सर व सिरसाट सर यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.संजय तुपे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे, उध्दव चौधर यांची उपस्थिती होती. सिरसाट सर म्हणाले की, योग नियमित केल्याने मनावरील व शरीरावरील ताण कमी होतो व शारीरिक आणि बौध्दीक क्षमतांचा विकास होतो असेही ते म्हणाले.

प्रत्यक्षीक घेण्यात आले सुर्यनमस्कार, कपालमाती, वज्रासन, ताडासन, अनुलोम, विलीम इ. योगाचे प्रकार प्राध्यापक व विद्यार्थ्यांना शिकवण्यास आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.उध्दव चौधर यांनी मानले.

दि.०१ ऑगस्ट २०१६ रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने या होत्या तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.संजय तुपे, कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे हे होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.उध्दव चौधर यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.नवनाथ पवळे यांनी मानले. या प्रसंगी स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दि.१५ ऑगस्ट २०१६ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. या दिवशी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम घेण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

दि.१८ ऑगस्ट २०१६ रोजी महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागामार्फत पोलीस स्टेशन व पत्रकारांना राखी बांधुन रक्षाबंधन हा दिवस साजरा करण्यात आला. या वेळी शिरूर पोलीस स्टेशनचे पी.आय. तानाजी दराडे, जयसिंग वायकर, एस.आय. सावंत यांच्यासह पत्रकार विजयकुमार गाडेकर, गोकुळ पवार, सतिश मुरकुटे, अशोक बादल, भारत पानसंबळ, पो.कॉ.जायभाये, गिते, शेळके इ. सह महा. उपप्राचार्य डॉ.संजय तुपे, कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे, डॉ.शामा लोमटे, प्रा.नवनाथ पवळे, प्रा.विठ्ठल जाधव, प्रा.सौ.सय्यद अफरोज, प्रा.रमेश घाडगे, प्रा.शेख इन्ताज इ. ची उपस्थिती हेती. याप्रसंगी पोलीस स्टेशन आवारात असणाऱ्या लोकांनाही विद्यार्थीतीनी राखी बांधली व रक्षाबंधन दिन साजरा करण्यात आला.

दि.१६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१६ दरम्यान महाविद्यालयात स्वच्छता पंधरवाडा राबविण्यात आला. तसेच स्वयंसेवकांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. परिसर स्वच्छता, महाविद्यालय स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. या प्रसंगी अल्पोपहार देण्यात आला.

Scanned by CamScanner

दि.१०.०९.२०१६ रोजी किटकजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहितीपर महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा.डॉ.पी.एन.घोलप व प्रा.टी.एस.पठाण यांनी अस्वच्छतेमुळे व पावसामुळे होणाऱ्या किटकजन्य आजाराची माहिती देण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

दि.१६ सप्टेंबर ते २४ ऑक्टोंबर या काळात पंचायत समिती जिल्हापरिषद, महानगर पालिका सार्वत्रिक निवडणुक २०१७ सार्वत्रिक निवडणुकीत महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाने जनजागृती मोहिम हाती घेतली होती. पोस्टर स्पर्धा घेण्यात अली, निंबंधस्पर्धा व वेगवेगळया स्पर्धामधुन निवडणुक आणि लोकशाही इ. बद्दल जनजागृती करण्यात आली.

दि.०३ ऑक्टोबर २०१६ रोजी महाविद्यालयात म.गांधी व लालबहादुर शास्त्री यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आले होते. अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने या होत्या तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.एस.के.तुपे कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.उध्दव चौधर यांनी केले तर आभार प्रा.संजय सावते यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी स्वयंसेवक विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

दि.१ ऑक्टोबर या दिवशी महाविद्यालयात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणादिन म्हणुन साजरी करण्यात आली.

दि.०१ ऑक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालय परिसरात आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासक डॉ.राजेश मचाले यांच्या हस्ते महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी इंजि.देशमाने साहेब, प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने, उपप्राचार्य डॉ.एस.के.तुपे, प्राचार्य काटे, प्रा.पी.एन घोलप, प्रा.उध्दव चौधर, प्रा.संजय सावते, प्रा.विठ्ठल जाधव व कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे उपस्थित होते. या ठिकाणी वनस्पती उद्यान व औषधी वनस्पतीची लागवड करण्यात आली. या प्रसंगी स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दि.०१ नोव्हेंबर २०१६ ते १५ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत स्वच्छता पंधरवाडा साजरा करण्यात आला. हातधुणे, परिसर स्वच्छता, वृक्षसंवर्धन इ. कार्यक्रमाने हा पंधरवाडा स्वच्छ भारत मिशन अंतर्गत साजरा करण्यात आला.

दि.३१.१०.२०१६ ते ०६.११.२०१६ दरम्यान या काळात सरदार वल्लभाई पटेल जयंती राष्ट्रीय एकता दिन म्हणुन साजरी करण्यात आली.

दि.१९ ते २५ नोव्हेंबर २०१६ हा दिवस कौमी एकता सप्ताह महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

दि.२४ डिसेंबर २०१६ रोजी महाविद्यालयात तालुकास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या रा.से.यो.विभागाची विद्यार्थीनी

Scanned by CamScanner

कु.अश्विनी पुरी (प्रथम), भाग्यश्री जाधव (द्वितीय) व सचिन खेडकर (तृतीय) बक्षीस मिळाले. या कार्यक्रमाचे परिक्षण करण्यासाठी रा.से.यो. विभाग प्रमुख डॉ.अशोक घोळवे यांनी काम पाहिले.

रोकड रहित महाराष्ट्र धोरण राबविण्यात राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सहभाग नोंदवला शिरूर गावांत लॅपटॉप,. ए.टी.एम. इ. बाबत व्हॅलेट, पेटीएम, इ. ची माहिति विद्यार्थंना व ग्रामस्थांना वाणिज्य विभागाच्या वतीने देण्यात आली त्यात रा.से.यो. विभागातील स्वयंसेवकांचा सहभाग होता.

दि.२५ जानेवारी २०१७ हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणुन साजरा करण्यात आला.

दि.२६ जानेवारी २०१७ रोजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनी ध्वजावंदन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी स्वयंसेवक मोठया प्रमाणात उपस्थित होते. या प्रसंगी अल्पोपहार देण्यात आला.

महाविद्यालयात १२ जानेवारी ते १६ जानेवारी २०१७ या काळात 'युवा सप्ताह' घेण्यात आला. यात विद्यार्थी स्वयंसेवक वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, रांगोळीस्पर्धा, मॉडेलस्पर्धा घेण्यात आल्या त्यांत रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी मोठयाप्रमाणात सहभाग नोंदवला. या प्रसंगी स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दि.३० जानोरी २०१७ ते ६ फेब्रुवारी २०१७ या कालावधीलत राष्ट्रीय सेवायोजना विभागाचे विशेष शिबीर मौजे पाडळी येथे घेण्यात आले. (शिबीराचा स्वतंत्र अहवाल सोबत जोडला आहे.)

दि.२१.०३.२०१७ रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभाग व दै.सकाळ इन यांच्या संयुक्त विद्यमाने पशुपक्षांसाठी झाडांना टोपले बांधुन महाविद्यालय परिसरात अभिनव उपक्रम राबविण्यात आला. प्राचार्य डॉ.पी.देशमाने यांच्या प्रयत्नातुन पर्यावरण संरक्षणासाठी व तहानलेल्या पक्षांना पाणी मिळावे हे उल्लेखनीय बाब महाविद्यालयात झाली.

Scanned by CamScanner

डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (का.) जि.बीड

## *राष्ट्रीय सेवा योजना विभाग विशेष शिबीर*

## *अहवाल २०१६-१७*

कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे विशेष शिबीर दि.३०/०१/२०१७ ते ०६/०१/२०१७ या कालावधीत दत्तक गांव मौजे पाडळी ता.शिरूर (का.) जि.बीड येथे पार पडले.

पाडळी या गावात शिबीर घेण्याचे ठरले. तसी विद्यापीठाकडून रितसर मान्यता घेण्यात आली. राष्ट्रीय सेवायोजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे आणि प्रा.उध्दव चौधर यांनी मौजे पाडळी या गावाला भेट दिली. दि.२५.०१/२०१७ रोजी ही भेट दिली. सरपंच महादेव कंठाळे उपसरपंच सौ.आशाबाई इंगळे यांची भेट घेतली ग्रामस्थांशी चर्चा केली. तेंव्हा त्यांनी ''२६ जानेवारी या दिवशी ग्रामसभा असते त्यात निवेदन करा.'' असे सांगीतले.

दि.२६ जानेवारी २०१७ रोजी ग्रामसभा चालु होती. त्या ग्रामसभेत रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे यांनी विशेष शिबीरा बद्दल ग्रामस्थांना माहिती दिली. मागील वर्षामध्ये पाणलोट विकासाचे काम पूर्ण केले होते. चालु शिबीरामध्ये शोषखड्डे, सांडपाण्याची व्यवस्था, वृक्ष लागवड झालेली होती. त्या झाडांना खड्डे आणि आळे करणे, ग्राम सफाई इ. कामे शिबीरात केली जातील असे त्यांनी सांगीतले.

दि.३० जोनवारी २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक महाविद्यालयात उपस्थित झाले. व त्यांच्यामार्फत शिबीराचे सर्व सामान टेम्पोत टाकुन मौजे पाडळी या गावांत आणण्यात आले. स्वयंसेवकांनी पाडळी येथील पाडळी हायस्कुल पाडळी या शाळेची साफ सफाई केली. पाण्याची व्यवस्था केली. ग्रामस्थांशी संवाद साधला रात्री विद्यार्थ्यांचे जेवन झाल्यानंतर दुसऱ्या दिवसीच्या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली व सांस्कृतिक कार्यक्रम झाल्यानंतर स्वयंसेवक १०.०० वा झोपले.

दि.३१ जानेवारी २०१७ रोजी स्वयंसेवक ५.०० वा शुभप्रभात ६.०० ते ६.१५ रासेयो गीत व प्रार्थना ६.१५ ते ७.०० या वेळात व्यायाम, योगासने, व शारीरिक कसरत ७.०० ते ७.३० अल्पोपहार करूण स्वयंसेवकांनी गावांत प्रभातफेरी काढली.



Scanned by CamScanner

या प्रभात फेरीमध्ये रा.से.यो. चे बॅनर स्लोगण आणि घोषणा देण्यात आल्या. स्वयंसेवकांनी हातात झाडू घेऊन रस्त्यात साचलेली घान साफ केली. रस्ते स्वच्छ आणि सुंदर केले. गावकऱ्यांना शिबीराच्या उद्घाटणाचे निमंत्रण दिले.

सकाळी ११.०० वा. शिबीराच्या उद्घाटण समारंभास सुरूवात झाली. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून शिरूर (का.) येथील नायब तहसिलदार मा.महादेव करांडे यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने, या होत्या तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणुन पाडळी हायस्कुल पाडळीचे मुख्याध्यापक श्री.अप्पासाहेब येवले, सरपंच महादेव कंठाळे, आशाबाई इंगळे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे यांनी केले. त्यांनी आठ दिवसात होणाऱ्या विविध राष्ट्रीय, समाज उपयोगी कामाची माहिती दिली. शिबीराच्या पाठीमागचा उद्देश सांगीतला. प्रमुख उद्घाटक यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वरूप वैशिष्टये सांगीतली. स्पर्धापरिक्षेचे मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी राष्ट्रीय सेवायोजनेच्या शिबीराचा फायदा होतो. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये कष्ट करण्याची प्रबळ इच्छाशक्ती जागृत होते. त्यातुनच देशासाठी सक्षम आधिकारी निर्माण होतात असेही त्यांनी सांगीतले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने या म्हणाल्या की, देशाची पिढी व्यवस्थीत घडविण्यासाठी देशाच्या आधारस्तंभाचा जडणघडण अशा वेगवेगळया शिबीरातुन होत असते. शिबीर हे कलागुणांच्या विकासाबरोबरच संस्कार देतात. त्यामुळे उत्कृष्ठ संस्काराचे बिजारोपण राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरातुन होते असे ही त्या म्हणाल्या या प्रसंगी सरपंच महादेव कंठाळे अप्पासाहेब येवले कार्यक्रमाधिकारी उध्दव चौधर यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.सी.व्ही. डोंगळीकर यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा.संजय सावते यांनी मानले. या उद्घाटन शिबीरास स्वयंसेवक, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

दुपारचे जेवन झाल्यानंतर विश्रांती घेऊन स्वयंसेवक आणि कार्यक्रमाधिकारी यांनी शिवार फेरी काढली. रात्रीचे जेवन झाल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम शिबीरार्थ्यांने केला व शुभरात्र.

दि.०१/०२/२०१७ रोजी सकाळी वरीलप्रमाणे दिनक्रम झाल्यानंतर स्वयंसेवक हातात खोरे, पाटी, टिकाव, घेऊन पाडळी गावांत गेले. तेथे झाडांना आळे करणे, तुंबलेल्या नाल्या साफ करणे इ. बरोबरच साचलेला कचरा एका खड्डयात टाकून नालीचे पाणी त्या खड्यात सोडले. त्यामुळे कंपोष्ट खत तयार होण्याची प्रक्रिया सुरू झाली. व दुपारी १२.३० वा. स्वयंसेवक निवास्थानी आले. अंघोळ जेवन झाल्यानंतर दुपारच्या कार्यक्रमाची तयारी करू लागले.



Scanned by CamScanner

दुपारी ३ ते ५ या वेळेत प्रा.अरूण राख बाबुजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी व दै. झुंजार नेताचे तालुका प्रतिनिधी मा.बबन देशमुख यांचे व्याख्यान प्रा.विठ्ठल गुंडे होते. या दिवसीचा व्याख्यानाचा विषय होता. राष्ट्रीय सेवा योजनेत युवकांची भूमिका या विषयावर त्यांनी आपले मत मांडले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु.आमृता केदार हिने केले तर प्रस्ताविक कु.खेडकर पल्लवी हिने केले. पाहुण्यांचा परिचय कु.कोमल कानडे हिने केला तर मान्यवरांचे आभार कु.अंजली कातळे हिने मानले.

गुरूवार दि.०२.०२.२०१७ सकाळचा दिनक्रम व श्रमदान, भोजन संपल्यानंतर कृषि विभागाच्या शेती विषयक योजना या विषयावर शिरूर येथील कृषि पर्यवेक्षक श्री.अर्जुन चव्हाण, दिलप तिडके यांचे व्याख्यान झाले तर अध्यक्षस्थानी दै.पार्श्वभूमीचे तालुका प्रतिनिधी अशोक भांडेकर हे होते कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वयंसेवक अक्षय पवार याने केले तर प्रस्ताविक रामसींग गडदे याने केले पाहुण्यांचा परिचय सचिन नेटके याने करूण दिला तर मान्यवरांचे आभार आण्णा पवार यांनी मानले.

शनिवार दि.०३/०२/२०१७ रोजी तरूण वयातील आरोग्याची समस्या या विषयावर डॉ.सुषमा सानप, डॉ.प्रियंका जवरे, डॉ.प्रिती बडे यांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष दै.दिव्यमराठीचे तालुका प्रतिनिधी मा.सुरेश राजहंस हे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बाळू खेडकर यांनी केले तर प्रस्ताविक नितीन केदार यांनी केले व आभार अशोक जेधे यांनी मानले.

दि.०४/०२/२०१७ शनिवार या दिवशी तालुकास्तरीय कवी संमेलन घेण्यात आले. कवी अनंत कराड, विठ्ठल जाधव, विजयकुमार गाडेकर, सतिश मुरकुटे, कैलास तुपे श्री.तांबे, भगवान फुंदे, गोकुळ पवार, भारत पानसंबळ, रा.ज.कातखडे, डॉ.सुधीर येवले या निमंत्रित कवींचे कवीसंमेलन झाले. स्वयंसेवकांनी आपल्या कविता सादर केल्या.

दि.०५/०२/२०१७ रविवार रोजी स्वच्छगांव सुंदर गांव या विषयावर संदीप ढाकणे, प्रा.डॉ.रामनाथ वाढे, प्रा.बाळासाहेब कटारे यांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन नेटके राणी यांनी केले तर प्रस्ताविक कोल्हे आयोध्या यांनी केले व आभार बडे राणी यांनी मानले.

रात्री ८ ते ११ या वेळात पी.व्ही.पी. महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ.मधुकर क्षीरसागर यांचे व्यसनमुक्ती प्रवचन झाले या प्रवचनास रात्री मोठयाप्रमाणात ग्रामस्थ पुरूष व महिला उपस्थित होते.

समारोप दि.०६/०२/२०१७ रोजी उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनाने झाला.

दि.०६/०२/२०१७ रोजी आदर्श समाज निर्मितीची निकोप शक्ती राष्ट्रीय सेवायोजनेत असते. शिबीरात घडलेले व्यक्तिमत्व समाजात स्वयंसेवकाचे काम करते. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे यांनी केले ते कालिकादेवी कला

Scanned by CamScanner

वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर पाडळी येथे पार पडले. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.पी.बी.देशमाने होत्या तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.संजय तुपे हे होते तर व्यासपीठावर सरपंच महादेव कंठाळे, मु.अ. अप्पासाहेब येवले, कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे व प्रा.उध्दव चौधर यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि.३० जानेवारी २०१७ ते ०६ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत हे शिबीर घेण्यात आले. पुंढे बालतांना प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे म्हणाले की, ''माणसांच्या जीवनात दोन शक्यता असतात. एक तो देवा सारखा वागतो. तोच व्यक्ती राक्षसासारखा ही वागतो. ज्या अंगाचा जास्त विकास होईल तसा तो जीवनभर वर्तन करतो. अशा शिबीरात प्रत्येक घटकातुन शिकवन मिळते. मानवी गुणांची नैसर्गीक वाढ घेऊन जीवनाच्या परीक्षेत यशस्वी होण्याचे तंत्र आत्मसात होत असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ.अजय तुपे म्हणाले की, ''फळाची अपेक्षा न करता काम करा. झोकुण देऊन काम केल्याने समाधान मिळते. तेच चेहऱ्यावर उमटल्याने इतरांपेक्षा शिबीरातील घडलेला तरूण उठून दिसतो असे ही ते म्हणाले.

या प्रसंगी प्रस्ताविकात बोलतांना कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक घोळवे म्हणाले की, जीवन हे समाजाने आखुन दिलेल्या चौकटीत जगावे लागते. या चौकटीच्या बाहेर जाणारे व्यक्तिमत्वाची जडण घडण रा.से.यो. शिबीरातुन होते असे ही ते म्हणाले त्यांनी सात दिवस केलेल्या शिबीरातील कामांचा आढावा घेतला. या प्रसंगी मु.अ.येवले यांचे ही भाषण झाले. या कार्यक्रमासाठी डॉ.शाम सानप, डॉ.प्रकाश घोलप, डॉ.सी.व्ही. डोंगळीकर, प्रा.राज कारडे, प्रा.डॉ.रमेश लांडगे, प्रा.सावते संजय, प्रा.रमेश लाहोटी, प्रा.के.एच.वाघमारे, प्रा.सौ.सय्यद अफरोज, प्रा.संदीप संपाळ, प्रा.रमेश घाडगे, आदिंसह ग्रामस्थ व शिबीरार्थी स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

शिबीर समारोप झाल्यानंतर स्वयंसेवक आपापल्या घरी गेले.

**उल्लेखनीय राष्ट्रीय योगदान :-**

**१) मतदार जागृती अभियान :-**

शिबीर कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक सुरू होती. या प्रक्रियेमध्ये स्वयंसेवक घरोघरी जाऊन मतदार जागृती केली. EVM मशिन दाखवुन मतदान करणे, योग्य सुशिक्षीत मतदारालाच मतदान करणे, पैसे घेऊन मतदान करू नका, आपले मत अमुल्य आहे, नोटा चाही वापर कसा करावा या बद्दल माहिती दिली. यामुळे या शिबीरात लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार जागृती अभियान यशस्वी झाले.

Scanned by CamScanner

२) **पर्यावरण रक्षणात :-**

* **वृक्षसंवर्धन :**

राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या काळात वृक्ष संगोपन व नवीन वृक्ष लागवडीसाठी खड्डे खोदण्याचे काम झाडांना आळे खोदणे व बाजूचा पाला, गवत त्याच खडयात टाकून जमिनीची धूप कमी केली. वृक्षांना पाणी घातले, त्यामुळे पाला पाचोळा व गवत यांचे कंपोष्टखत निर्माण होण्यासाठी मदत झाली. झाडांना शेळी, जनावरे खाऊ नयेत म्हणून वृक्षांना कुपाटी लावुन त्यांचे संरक्षण केले.

* **गर्भवती माता व बालकांना सकस अहारांची माहिती :-**

ग्रामीण खेडे म्हटले की, आरोग्या बद्दलचे अज्ञान मोठया प्रमाणात असते. त्यांचे अरोग्य सुधारावे लहान मुलांच्या, नवजात बालकांच्या निकोप वाढीसाठी सकस आहारात फळे, भाज्या, दुध, अंडे, कडधान्ये, मटन, मासे इ. आहाराबद्दलची माहिती सांगीतली या कामी ग्रहशास्त्र विभागाची मदत घेण्यात आली.

* **कंपोष्ट खत निर्मिती :**

शिबीर काळात स्वयंसेवकांनी ग्रामसफाई केल्यानंतर जो कचरा गोळा केला तो खडयात टाकला. सांडपाण्याचे पाणी त्यात सोडले. असे गांवा भोवती खोदले. त्यामुळे कंपोष्ट खताची उपलब्धी होणार आहे. गावात लावलेल्या वृक्षांना हेच खत वापरता येईल उर्वरीत खत शेतकऱ्यांच्या शेतीला उपयोगी पडेल.

* **विविध ग्रामीण भागासाठी व शेतकऱ्यांसाठीच्या अर्थसाहयाच्या योजनांची माहिती-**

आज शेती परवडत नाही म्हणून शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करतात. निसर्गाचा लहरीपणा हे मुख्य कारण आहे. मात्र शासनाच्या विविध शेतीसाठीच्या योजनांची माहिती त्यांना नसते अनुदानात उपलब्ध होणारे सुक्ष्मसिंचन शेती अवजारे, खते, बियांने यांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

* **अरोग्य जनजागृती व उपाययोजना :**

अरोग्याची सामुहिक अरोग्याची समस्या राष्ट्रीय समस्या आहे. उघडयावर सौच्छास जाणे, सांडपाण्याची व्यवस्था न लावणे, अरोग्यदायी वातावरण निर्मितीसाठी प्रयत्न नसणे यामुळे रोगराई, साथीचे रोग पसरतात. त्यामुळे अरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. स्वयंसेवकांनी गावात सांडपाण्याचे व्यवस्थापण करूण दिले. वृक्ष संवर्धनातुन स्वच्छ आणि मुबलक ऑक्सीजन पुरवठा होतो. वृक्षांचे संवर्धन केले. उघडयावर सौच्छास जाण्याचे तोटे काय असतात याची माहिती दिली. अशा प्रकारे अरोग्य विषयक जनजागृती व उपाय योजनांची माहिती दिली.

Scanned by CamScanner